दैनिक महाराष्ट्र
# सूर्योदय
www.esuryodaylive.com
Email : suryodaykokan.123@gmail.com
मुख्य संपादक : गंगाधर काळकुटे
भरत सरपरे (संपादक कोकण आवृत्ती)





कोकण || वर्ष २ रे || अंक २३० || सोमवार ०५ ऑगस्ट २०२४ || RNI No.MAHMAR/2014/54581 || Postal Regd No.L/74/RNP/Beed/2019-21 || पाने ४ किंमत २ रुपये ||

# ताम्हीणी घाटातून जाणारी वाहतूक आज बंद

रायगड जिल्हा उत्तर प्रतिनिधी/
मंगेश यादव

माणगाव मार्गे ताम्हीणी घाटातून जाणारा रस्ता पुणे जिल्ह्याच्या हद्दीत खचल्याने शुक्रवारी (ता.२) दुपारी बारा वाजल्यापासून सोमवारी (ता.५) सकाळी आठ वाजेपर्यंत या मार्गावरील वाहतूक बंद करण्यात आली आहे. पुणे जिल्हाधिकारी यांनी याबाबत सूचना जाहीर केली आहे. जिल्हाधिकारी यांनी आदेशात नमूद केले आहे की पुणे ते माले गाव ते पुणे रायगड जिल्हा हद्द ते माणगाव राष्ट्रीय महामार्ग क्र. ७५३ एफ चे रुंदीकरणाचे कामकाज चालू असून पुणे जिल्हयाला अतिवृष्टीचा रेड अलर्ट देण्यात आला आहे. राष्ट्रीय महामार्ग क्र. ७५३ एफ वरील ताम्हिणी घाट क्षेत्रात अतिमुसळधार पाऊस सुरु आहे. त्यामुळे मौजे आदरवाडी गाव येथील घाट परिसरात राष्ट्रीय महामार्ग क्र. ७५३ एफ वर साखळी क्र. ६३/००० येथे दरड कोसळल्यामुळे महामार्ग पूर्णतः बंद केला होता. सदरच्या दुर्घटनेमुळे महामार्गाच्या कडेला महामार्गाच्या हद्दीत पिकनिक फॅमिली हॉटेलमधील एक व्यक्ती मयत व एक व्यक्ती जखमी झाला होता.आणि दिनांक ०१ ऑगस्ट २०२४ रोजी मौजे आदरवाडी व डोंगरवाडी गाव



येथील घाट परिसरात राष्ट्रीय महामार्ग क्र. ७५३ एफ वरील साखळी क्र.६१/६५० ते ६१/६८० मध्ये रस्त्याला एका बाजूने अतिवृष्टीमुळे तडा गेला असून रस्ता खचलेला आहे. सदरचे ठिकाण हे ताम्हिणी घाट वन परिसर क्षेत्रात असून अतिमुसळधार पावसामुळे रस्ता एका बाजूने खचलेला आहे. रस्ता खचलेल्या ठिकाणी दुरुस्तीचे काम चालू आहे व वाहतूक सुरक्षितेच्या दृष्टीने उपाययोजना करणे सुरु असून आता महामार्गावरील वाहतूक सदर ठिकाणी एका बाजूनेच चालू ठेवलेली आहे. तसेच पुढील काही दिवसात अतिवृष्टी झाल्यास सदर रस्ता अजून खचून अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे सदर महामार्गावरुन नियमित वाहतूक ठेवणे धोकादायक आहे. तरी शनिवार व रविवार या दिवशी ताम्हिणी घाट परिसर क्षेत्रात पर्यटनासाठी अनेक लोकांची गर्दी होत असून राष्ट्रीय महामार्ग क्र. ७५३ एफ हा बंद करणे आवश्यक आहे. त्याअर्थी मी डॉ. सुहास दिवसे, जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, पुणे आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ आणि मोटार वाहन कायदा १९८८ चे कलम ११५ मधील तरतुदीनुसार व शासन गृह विभागाचे दि. १९/०५/१९९० चे अधिसूचनेनुसार प्राप्त झालेल्या अधिकाराने मौजे आदरवाडी व डोंगरवाडी गाव येथील घाट परिसरात राष्ट्रीय महामार्ग क्र. ७५३ एफ वरील रस्त्याला एका बाजूस अतिवृष्टीमुळे तडा गेला असून रस्ता खचलेला असल्याचे दिसून येत आहे. तरी त्या ठिकाणी दुर्घटना टाळणेच्या अनुषंगाने राष्ट्रीय महामार्ग क्र. ७५३ एफ हा रस्ता दि ०२ ऑगस्ट २०२४ रोजी दुपारी १२:०० पासून ते दि ०५ ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी ०८:०० वाजेपर्यंत बंद करण्यात येत आहे. असे आदेशात नमूद केले आहे. ङ्गङ्गङ्गएसटीचा मार्ग बदलला ङ्ग माणगाव मार्गे ताम्हिणी घाटातून जाणारा रस्ता पुणे जिल्ह्यात हद्दीत खचल्याने दोन ऑगस्ट दुपारी बारा वाजल्यापासून पाच ऑगस्ट सकाळी आठ वाजेपर्यंत या मार्गावरील वाहतूक बंद करण्यात आली आहे. म्हणून रोहा अक्कलकोट ही बस पाली मार्गे फिरवण्यात आलेली आहे. या मार्गावरून पुण्याकडे जाणाऱ्या इतरही काही बस आहेत त्यांचाही मार्ग बदलण्यात आलेला आहे

## कोलाड रोहा राज्य मार्गाला पाले खुर्द नजिक पडले भगदाड सर्वत्र एकच खळबळ.

रायगड जिल्हा
उत्तर प्रतिनिधी मंगेश यादव

मुंबई गोवा महामार्गाला जोडला गेलेला कोलाड रोहा राज्य मार्गाला शुक्रवारी दिवसभर धो धो कोसळणाऱ्या पावसात सायंकाळच्या सुमारास पाले खुर्द आणि आशोक नगर या दरम्यान भले मोठे भगदाड पडले असल्यामुळे वाहन



चालकांसह प्रवाशी वर्गात एकच खळबळ उडाली तर मार्गाला लागून कुंडलिका नदीपात्र तर दुसऱ्या बाजूने कालवा वाहत असल्याने पाणी जाण्याच्या मार्गावर भला मोठा गुरुल लागल्याने मोठा खड्डा पडला तर ते पाणी रस्त्याच्या खालच्या बाजूने वाहत गेल्याने वरती डांबर मात्र खालील रस्त्याची पोखरण झाल्याने मोठा धोका निर्माण होण्याचे चिन्ह दिसत आहेत. तसेच या ठिकाणीं कोलाड पोलिस स्टेशन चें पोलिस निरिक्षक नितीन मोहीते आणि पाले ग्रामस्थानी घटनास्थळी धाव घेत उपाय योजना करण्याचे काम युद्ध पातळीवर सुरू असल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे.

## रत्नागिरी उत्तर जिल्हा विस्तारीत बैठकीस मा.आ.नितेश राणे गुहागरात

मंडणगड प्रतिनिधी

भारतीय जनता पार्टी रत्नागिरी (उत्तर) जिल्हा विस्तारित कार्यकारिणीची बैठक पुजा

मंगल कार्यालय गुहागर येथे जिल्हाध्यक्ष



केदार साठे यांच्या उपस्थित पार पडली.सदर अधिवेशनास मा.आ.नितेश राणे बैठकीत प्रमुख मार्गदर्शक म्हणुन उपस्थित राहुन रत्नागिरी उत्तर मधील प्रमुख पदाधिकारी, बूथ वारियर्स, बूथ अध्यक्ष, शक्तिकेंद्र प्रमुख यांच्याशी संवाद साधला.

यावेळी गुहागरचे माजी आमदार विनय नातू, मधूकर चव्हाण, सूर्यकांत दळवी, धैर्यशील पाटील, रत्नागिरी उत्तर महिला अध्यक्ष सुरेखा खराडे, स्मिता जावकर, चित्रा चव्हाण, नीलम गोंधळी, विठ्ठल भालेकर, श्रीराम इदाते,विश्वदास लोंखडे, गुहागर तालुका अध्यक्ष निलेश सुर्वे, दापोली तालुका अध्यक्ष संजय सावंत, मंडणगड तालुका अध्यक्ष आप्पा मोरे, चिपळूण तालुका अध्यक्ष अजित थरवळ, वसंत ताम्हणकर, खेड तालुका अध्यक्ष ऋषिकेश मोरे, किशोर आंग्रे, अनिकेत कानडे, जिल्हा युवाध्यक्ष अतुल गोंधकर, आदी उपस्थित होते.

## गटारी अमावस्येला मटणावर ताव ; खवय्यांची चंगळ व्यावसायिक खुश

पाली /बेणसे
(धम्मशील सावंत )

दीप अमावस्या म्हणजेच गटारी अमावस्या रविवारी (ता. ४) मोठ्या उत्साहात साजरी झाली. अनेकांनी मटणावर



ताव मारला. त्यामुळे सकाळ पासूनच मटण विक्रेत्यांच्या दुकानात मटण खरेदीसाठी खवय्यांनी मोठी गर्दी केली होती. मटण, मासळी व चिकन व्यावसायिक खुश होते. शिहू बेणसे विभागातील मटण, चिकन विक्रेते दिसणार नाहीत इतकी ग्राहकांची गर्दी उसळली होती.

सोमवार पासून (ता. ५) श्रावण महिन्यास सुरुवात होत आहे. अनेकजण या महिन्यात मांसाहार वर्ज्य करतात. त्यामुळे रविवारी आलेल्या गटारीला मांसाहारावर अनेकांनी ताव मारला. गटारी रविवारी आल्याने खवय्ये खुश होते. काही जणांनी शुक्रवारी देखील मांसाहारावर ताव मारला. मटणाबरोबरच मासळीला देखील खवय्यांनी पसंती दिली. त्यामुळे मासळीचे भाव मोठ्या प्रमाणात वधारले होते. मासळी विक्रेत्यांचा व्यवसाय देखील चांगला झाला. अनेकांनी मासळीची आगाऊ ऑर्डर दिली होती असे पालीतील मासळी विक्रेत्या गौरी मनोरे यांनी सांगितले. तर मटण व्यावसायिक देखील आनंदी होते. गटारीला गर्दी होणार याचा अंदाज घेऊन गटारीच्या आधीच पूर्ण तयारी करून ठेवली होती असे पालीतील मटण विक्रेते फिरोज तांबे यांनी संगितले. तर चिकन विक्रेते हेमंत राऊत म्हणाले की, काही लोकांनी चिकन ला पसंती दिली. गटारी निमित्त नेहमीपेक्षा अधिक माल भरून ठेवला होता असे राऊत म्हणाले.

## किरकोळ गुटखा विक्रेताला महाराष्ट्र शासन धरतोय वेठीस,इतर राज्यात राजरोस पणे गुटखा उत्पादन सुरु,मग टीव्हीवर करोडो रुपयाची जाहिरात कशासाठी?

# व्यावसायिकांकडून संतप्त प्रतिक्रिया

रायगड जिल्हा
उत्तर प्रतिनिधी/मंगेश यादव

आधुनिक काळात छोटा व्यावसायिकांना कोणताही व्यवसाय करणे कठीण झाले आहे.पूर्वी फक्त गुटखा विक्री करुन किरकोळ व्यावसायिकांचा व्यावसाय तेजीत होता परंतु या किरकोळ गुटखा विक्रेत्याला महाराष्ट्र शासन वेठीस धरत आहे परंतु इतर राज्यात राजरोस पणे गुटखा व्यावसाय सुरु असून तो महाराष्ट्रात येत आहे.मग महाराष्ट्रात गुटखा बंदी राज्य सरकारने केली असली तरी टीव्ही वर करोडो रुपयांची गुटख्याची जाहिरात का दाखवली जाते अशी संतप्त प्रतिक्रिया किरकोळ व्यावसायिकांकडून केली जात आहे.ङ्ग महाराष्ट्र शासनाने गुटखा बंदी केली आहे परंतु गुजरात मध्ये गुटखा उत्पादन करण्यासाठी शासनाची परवानगी दिली आहे. गुजरात मधील माल महाराष्ट्रात छुप्या मार्गाने विकला जात आहे त्याचा फायदा गुजरातला होत आहे.तसेच महाराष्ट्रात ही छुप्या मार्गाने गुटखा उत्पादन सुरु आहे.त्यांचा करोडो रुपयांचा हप्ता सुरु असल्यामुळे त्यांच्यावर कोणतेही कार्यवाही केली जात नाही.फक्त एक दोन पाकीट विकणारे किरकोळ व्यावसायिक यांना शासन वेटीस धरून त्यांच्या कडून हप्ता वसुली केली जात आहे.ङ्ग कोरोना महामारीत अनेकांना नोकऱ्या गमवाया लागल्या नोकरीं गेलेले तरुण छोटा व्यवसाय करून आपला उदरनिर्वाह करीत आहेत.परंतु प्रत्येक पान टपरी वर गुटख्याला प्रचंड मागणी आहे. कारण दारू पेक्षा गुटख्याची किमत कमी आहे त्यामुळे सर्वसामान्य माणसाला गुटखा घेणे परवडणारे आहे.परंतु महाराष्ट्र शासनाने गुटखा बंदी केली असली तरी गुटखा राजरोज पणे सुरु आहे. याला कारण उत्पादन करणाऱ्या कडून करोडो हप्ता गोळा केला जात आहे.या जीवावर गुटखा उत्पादन सुरु आहे मग गुटखा बंदी किरकोळ व्यापाऱ्यालाआहेक्रा लादली जात आहे. गुटखा बंदी केली तरी १८ रुपयाला मिळणारी पुडी ३० रुपये देऊन खरेदी केली जात आहे.वाईन शॉप प्रमाणे गुटखा विक्री ला परवानगी द्या यातून शासनाला जादा कर मिळेल परंतु असे केले तर हप्ते गोळा करून काळा धन कमावणाऱ्यांचा फायदा कमी होईल यामुळे गुटखा विक्री खुली करण्यासाठी परवानगी दिली जात नाही असे छोट्या व्यावसायिकांकडून बोलले जात



